**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. २.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव –** भरत आनंदा सावंत.

**वय** - ४८ वर्ष, **हुद्दा** - जवान,

**नेमणूक**- रा.ऊ.शु., गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

**सरकार पक्षातर्फे सरतपास– श्रीमती. एस. ए. म्हामूलकर, सरकारी वकील.**

**१.** मी सन २०१३ पासून रा.ऊ.शु. जवान म्हणून कार्यरत आहे. दि.०२.०७.२०२४ रोजी दुय्यम उपनिरीक्षक, रा.ऊ.शु. चंदगड कार्यालय गडहिंग्लज येथे हजर असताना गुप्त बातमीदारा कडून बहिरेवाडी गावच्या पश्चिमेस, महादेव डोंगराच्या पायथ्या शेजारील ओढयाजवळ एक इसम अवैधरित्या गावठी दारुची निर्मिती करत असल्याची बातमी मिळाली होती. सदर बातमी मिळाल्यानंतर मी वरिष्ठ व पंचांसह खाजगी वाहनाने मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी गेलो होतो.

**२.** आम्हाला तेथे एक इसम मिळून आला होता. आम्ही त्याला माहिती देऊन त्याची झडती घेतली असता, आम्हाला त्याच्या ताब्यात एक भट्टी बॅरेल, प्रत्येकी १०० लिटर रसायनाचे भरलेले दोन लोखंडी बॅरेल, ७ लिटर गावठी दारु असलेली एक प्लॅस्टीक घागर मिळून आले होते. आम्ही त्याला त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव सुनिल नाईक असल्याचे सांगितले होते. वरिष्ठ वायदंडे यांनी आरोपीच्या ताब्यातून मिळून आलेल्या मुद्देमालातून रासायनिक तपासणीकामी मिळून आलेल्या रसायनाच्या व दारुच्या प्रत्येकी १८० मिलीच्या दोन काचेच्या बाटल्या सिलबंद करुन त्याबाबतचा पंचनामा केला होता. आता मला तो पंचनामा दाखवला, त्याला नि. क्र.७ देण्यात आलेला आहे.

**३.** त्यानंतर आम्ही जप्त मुद्देमाल व आरोपीसह पोलिस ठाण्यात आल्यानंतर मी त्याच्या विरोधात तक्रार दिली होती. आता मला मी दिलेली तक्रार दाखवली, त्यातील मजकूर बरोबर असून त्याला नि. क्र.९ देण्यात येतो. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

नि. क्र. २ खाली.

**आरोपीतर्फे उलटतपास – श्री. डी. जे. देसाई वकील.**

**४.** वकील गैरहजर. आरोपीने उलट तपास नाकारला.

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १७.०३.२०२५.                    (आर. पी. थोरे)

आजरा.                    प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA